नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

दिनांक 21/08/2020 (शुक्रवार)
(सकाळ)

---

## जबरी चोरी

पो.स्टे. काटोल :– अंतर्गत मौजा हेमराज पर्वतचे शेता समोर काटोल– कोंढांळी रोडवर काटोल येथे फिर्यादी नामे– देविदास सदाशिव घायवट, वय 65 वर्ष, रा.सरस्वती नगर चौबेले आउट काटोल हे दि. 20/08/2020 रोजी दुपारी 03.00 वा. दरम्यान बॅक ऑफ इंडिया ऑरेंज प्लाझा काटोल येथे पैसे काढण्याकरीता त्यांच्या एमएच–40/जी– 4848 क्रमांकाच्या प्लॉटिना गाडीने गेले असता अंदाजे 03.15 वा. दरम्यान फिर्यादी यांनी बॅकेमधुन चेक दवारे 1,22,000/– रु. काढले. त्यानंतर दुपारी 03.45 वा. दरम्यान कोंढाळी रोडने जात असता त्या ठिकाणी दोन अज्ञात आरोपी हे एका लाल रंगाच्या पल्सर मोटर सायकलवर बसले होते. फिर्यादी हे तेथे पोहचताच त्यापैकी एका आरोपीने फिर्यादीस थांबण्याचा ईशारा दिल्याने त्यामुळे फिर्यादी तिथे थांबले. त्यादरम्यान आरोपीतांनी फिर्यादीचे पॅन्टचे दोन्ही खिशे चेक केले व फिर्यादीचे मोटर सायकलचे हॅन्डलला अटकलेली पैशाची थैली जबरीने काढुन घेवुन दोन्ही आरोपी त्यांचे पल्सर मोटरसायकलने कोंढाळी कडे पळुन गेले.

सदर प्रकरणी फियादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम 392, 34 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास महिला पोलिस उपनिरीक्षक अश्विनी वानखेडे 8888110877 हया करीत आहे.

## विनयभंग

पो.स्टे. अरोली :– दि. 18/08/2020 चे 17:04 वा. चे सुमारास फिर्यादी यांची 13 वर्षीय मुलगी पिडीता हि भेंडया तोडण्याकरिता घराच्या मागे गेली असता आरोपी नामे– आकाश बगुसिंग पटले, वय 25 वर्ष, रा. घाटमुंढरी याने पीडितेस मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. अरोली येथे आरोपीविरुध्द कलम 354 (अ) भादंवि. 12 बाल लैगींक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास मसपोनि श्री एन.जी. भुते 9822566180 या करीत आहे.

## फसवणुक

पो.स्टे. रामटेक :– अंतर्गत 7 कि मी अंतरावर मौजा नगरधन येथे दिनांक 16/08/2020 चे 14.45 वा. ते 14. 56 वा. दरम्यान आरोपीने त्याचे मोबाईल वरुन फिर्यादी नामे– नंदेश्वर गंगाधर बिरनवार वय 18 रा नगरधन रामटेक यांचे मोबाईल वर फोन करुन 'मी युको बॅक येथुन बोलतो' असे सांगुन फिर्यादीचे एटीएम चे 16 अंकी आक्डे व ओटीपी ची माहीती प्राप्त करुन घेतली. यानंतर आरोपीने फिर्यादीचे खात्यातुन कम्युनिकेशन साधनाद्वारे एकुण 5,980/– रु ची ऑनलाईन उचल करुन फसवणुक केली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. रामटेक येथे आरोपी विरुध्द कलम 66 (सी),66(ड) माहिती तंत्रज्ञान कायद्यानवये अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरु आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस नाईक दिपक यादव 7020626047 हे करीत आहे.

## जिवानाशी ठार करण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीतांना अटक

पो.स्टे. काटोल :– अंतर्गत ईराणी वस्ती काटोल येथे दिनांक 20/08/2020 चे 20:45 वा. ते 20.50 वा. दरम्यान फिर्यादीचा मुलगा गुलाम अली (जख्मी) वय 20 वर्ष हा त्याचा भाचा रेहान याला इरफानने का मारले हे विचारण्यासाठी इरफानचे घरी गेला असता आरापी कं. 1) सादिक हुजुर अली जाफरी वय 28 वर्ष याने त्याचे नाकावर ठोसा मारुन नाक फोडले. तसेच आरापी कं. 2) इरफान साबर अली जाफरी वय 26 वर्ष व आरापी कं. 3) सलमान साबर जाफरी वय 40 वर्ष तिन्ही रा. ईराणी वस्ती काटोल यांनी गुलाम अली याला जिवे मारण्याचे उददेशाने बेस बॉल स्टिकचा फटका गुलामचे डोक्यावर मारला व डोक्यावर विट मारून त्याला गंभीर जख्मी केले. त्यामुळे फिर्यादीचा मुलगा गुलाम अली हा बेशुध्द होवुन जागेवर पडला. त्याला उपचाराकरीता काटोल येथे सरकारी दवाखाण्यात नेले असता तेथील डॉक्टरानी उपचारा करुन नागपूर येथे उपचाराकरीता रेफर केले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. काटोल येथे आरोपीतांविरुध्द कलम 307, 34 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. यातील आरोपीतांना अटक करण्यात आली आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलिस उप निरीक्षक श्री. नरेंद्र पिवाल 8806117774हे करीत आहे.

## दुखापत

पो.स्टे. केळवद :– अंतर्गत 25 कि. मी अंतरावर मौजा नांदागोमुख येथे दिनांक 20/08/2020 चे 12:30 वा. दरम्यान फिर्यादी नामे देवराव दौलतराव देवळकर वय 70 वर्षे रा. नांदागोमुख हा मोटार सायकल वर बसुन शेतात जात असतांना फिर्यादीचा पुतन्या आरोपी नामे विनोद मानिकराव देवळकर वय 30 वर्षे रा. नांदागोमुख हा गाडी समोर येवुन व त्याची मोटार सायकल थाबंवुन फिर्यादीस म्हणाला कि, 'तुने खुनाच्या गुन्हयात साक्ष का दिला तुझ्यामुळे मला शिक्षा झाली आहे.' या कारणावरून आरोपीने फिर्यादीला अश्लिल शिविगाळ करून हातबुक्कीने मारहान करून व त्याने आपले खिशातुन चाकु काढुन फिर्यादीचे डोक्यावर, हातावर मारून जखमी केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. केळवद येथे आरोपीविरुध्द कलम 324, 341, 504, 506 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. यातील आरोपीला अटक करण्यात आली आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार अमर जिने हे करीत आहे.

.

.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर